# “मैत्री”जत्रा अशी झाली



१५-१६ ऑक्टोबर हे दोन दिवस कर्वेनगरमध्ये नटराज सभागृहात“मैत्री”-जत्रेचं आयोजन केलं होतं. स्वतःहातानी तयार केलेल्या वस्तू कलात्मक पध्दतीनी, परंतु व्यावसायिकता बाजूला ठेवून तिथे १२-१३टेबलवर मांडल्या होत्या.
“मैत्री” चं टेबल- नाव लिहून पुढे जाता येईल असं नव्हतं. त्यावर रद्दी-तिजोरी, साडीपासून शिवलेल्या पिशव्या, टोप्या,मैत्रीचे बिल्ले, माहितीपत्र, इंद्रधनु, यानी सज्ज होतं.
शेजारीच वारली पध्दतीच्या चित्रकलेचा उपयोग करून तयार केलेली भेटकार्ड,टेबलमेट्स होती. दिव्याच्या शोभिवंत शेडस् होत्या. उत्तम अशा पेंटिंग्जच्या फ्रेम्स होत्या.दिवाळीसाठी विविध प्रकारच्या सुशोभन केलेल्या पणत्या,दिवे, भेट पाकिटे होती. एका टेबलवर घरी तयार केलेली अक्रोड घातलेली कॉफीची,साधी अशी विविध प्रकारची चॉकलेटस्, उत्तम प्रतीचा अहिंसक मध,मोबाईल,चष्मा ठेवण्याची कापडी घरं, खांद्यावर घेण्याच्या रंगीबेरंगी कापडी पर्स होत्या. खिशात बसेल अशी पण लहान घडी होणारी शिवलेली पिशवी होती.





बटिक प्रिंटींग केलेले कुडते,साडी,स्कर्ट,ओढण्या,चुडीदार यांनी भरलेलं असं सर्वांचं लक्ष वेधून घेणारं, आणि सारखी गर्दी असलेलं पुढचं टेबल होतं.व्यवस्थित कपडे दिसावेत यासाठी त्यांनी एक लोखंडी मांडणीही आणली होती. भरतकाम करून तयार केलेले ड्रेसला लावण्याचे योक,उशांचे अभ्रे अशा मोजक्या वस्तुंचे नमुने, पंचक्राफ्ट या अनोख्या कलेचा उपयोग करून तयार केलेल्या दोन-तीनच वस्तू लक्ष वेधून घेत होत्या. फक्त आठ वर्षाच्या सई नी तयार केलेली मार्बल पेपर ची भेट पाकिट, आणि तिथेच तिच्या आजीच्या हातच्या सुबक वाती होत्या. दिवाळीसाठी घरी तयार केलेलं उटणे,पेपर क्वीलींगच्या
फ्रीजला महत्वाचे निरोप लावण्यासाठी केलेले लोहचुंबक लावलेले गणपती,फुलपाखरे अशा मोजक्या वस्तू घरी तयार करून हौसेने त्या विक्रीसाठी ठेवल्या होत्या. अगदी वेगळ्याच प्रकारचे म्हणजे धातूच्या कानातल्याना क्रोशाने सजवले होते.
अंगण सजवण्यासाठी कायम तयार असलेली प्लायवूड वर केलेली रचना, किंवा जेवणाचे ताट सजवण्याची महिरप, अशाही अनोख्या कलाकुसर केलेल्या वस्तुंनी जत्रेचे सभागृह भरून गेले होते.